# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०८/११/२०२३

## दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे राजापेठ अमरावती अप.क्र. ९५९/२३ कलम ३२४, ५०६ भा.द.वि. | रूख्मीणी नगर अमरावती शहर | ०७/११/२०२३ चे २१.००वा<br><br>दा.ता.वे ०७/११/२०२३ चे २२.५५ वा. | धर्मेद्र हरिप्रसाद बुंदेले वय ४३ वर्ष रा दस्तुर नगर अमरावती | किशोर झापे रा हमालपुरा अमरावती शहर | गुन्ह्यातील थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की ,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याचे दुकान बंद करित असतांना यातील नमुद आरोपी याने दारू पिण्यासाठी पैसे मागीतले असता फिर्यादीने पैसे दिले नाही म्हणुन आरोपी याने त्याचे जवळील लोखंडी आकोड्यानी डोक्यावर मारून जख्मी केले व फिर्यादी त्याचा धाकाने पळत असतांना आरोपीने मारण्याची धमकी दिली वरून फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

## घरफोडी:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अप. न. ९४७/२०२३ क. ४५४, ४५७, ३८० भादवि. | जयंत कॉंलनी, दस्तुर नगर, अमरावती | दि. ०६/११/२०२३ चे सायंकाळी ०७/०० वा ते दि. ०७/११/२०२३ चे ०८/०० वा. पर्यत दाखल ता वेळ - दि. ०७/११/२०२३ चे १७/०३ वा. | रौशन राजेन्द्र राजगडे वय २७ वर्ष रा. जयंत कॉंलनी, दस्तुर नगर, अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अश्या प्रकारे आहे यातील फिर्यादी यांचे घराचे बाधकाम सुरु असल्याने काल दि. ०६/११/२०२३ चे सायंकाळी ०७/०० वा. फिर्यादीचे वडील बांधकामाच्या ठिकाणी असलेले एका रुम मध्ये साहीत्य ठेवुन दाराला लॉंक करुन आले होते. दि. ०७/११/२०२३ चे ०८/०० वा. सुमारास यातील फिर्यादी यांनी बांधकामाच्या ठिकाणी जावुन पाहीले असता बांधकामाचे स्लॅप असलेल्या मागील रुमची लाकडी दरवाजा फिला तुटलेला दिसला तेव्हा घरात जावुन प्रवेश केला असता फिच्या लक्षात आले की फिच्या घरातुन अज्ञात चोरट्यांनी विनापरवानगीने १)१५०००/-रुपये कीमतीची डिवाल्ट कंपणीची १ ड्रीलर मशीन बुश कंपणीची १ ब्रेकर मशीन व टेक्मो कंपणीची १ पाण्याची इलेक्ट्रीक मोटर २)४००००/- रु. कीमतीची नेरोलॅंक कंपणीचे पेंट प्रत्येकी २० लिटरच्या ४ बकेटस असा एकुन ५५०००/- रुपयाचा माल फिचे जयत कॉंळनी दस्तुर नगर अमरावती येथील बांधकामाचे ठिकाणाचे स्लॅंपचे बांधकाम झालेल्या रुमपैकी मागील रुमचा दरवाजा तोडुन घरात प्रवेश करुन लबाडीच्या इराद्याने घरफोडी करुन चोरी करुन नेले आहे अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. ४३८/२०२३ कलम ३८० भादवी | अमरावती | दि. २९/०९/२३ चे सकाळी ११/०० वा<br>दि. ०७/११/२०२३ चे १४/०० वा<br>दाखल ता दि ०७/११/२३ वेळ- २२/३१वा | एक महिला | एक महिला | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फि ही भाड्याने तिचे नातेवाईक चे प्लॅट मध्ये राहत असुन त्याचे सोबत तिच्या नातेवाईक दोन्ही मुली शिक्षणा करिता राहत आहे.फि ने तिचे सोन्याचे जुने दागीने १)साकलीचा चपळा हार २० ग्रॅम २)दोन पदरी चपळा हार ४५ ग्रॅम ३)पट्टीचे मंगळसुत्र ३५ ग्रॅम ४)अष्ठकोणी मणी मोहन माळ १५ ग्रॅम ५)मिनी मंगळसत्र पट्टीचे १५ ग्रॅम ६)अगळी नवरत्न खडे असलेली अंगठी १० ग्रॅम असे एकुण १४० ग्रंम सोन्याचे दागीने कि.अं.७०००० रुपये चे हे लाकडी कपाटामध्ये लॉंक करुन ठेवले होता.नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि ही तिची अंगठी कपाटामध्ये ठेवणे करिता गेली असता कपाटात ठेवलेले एकुण १४० ग्रॅम सोन्याचे दागीने दिसले नाही सदर फि ने या बाबत पोस्टे ला अर्ज देणे करीता गेली असता तिच्या आरोपी नातेवाईक हीने सांगीतले की तु घरी चल मी तुला सांगतो तेव्हा ते सोने व माझे एका मुलावर प्रेम आहे त्याला मी ते दागीने नेवुन दिले त्या करित फि ने दि ०४/१०/१२ रोजी तिचे मित्रा याला बोलावीले तेव्हा त्याने सांगीतले की तुमचे सोन्याचे दागीने मला (आरोपी नातेवाईक) ने आणुन दिले ते दागीने मी १५ ते २० दिवसात परत आणून देईल परंतु फि चे आरोपी नातेवाईक ही सुद्धा घरुन पळुन गेली तिने सोन्याचे दागीने १४० ग्रॅम कि.अंदाजे ७००००० रुपये चे चोरुन नेले अशी फि यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १३४५/२३ कलम ३८० भादवि | शाम पाटील राधाकृष्ण मंदीरजवळ पलाश लाईन अमरावती | दि.०७.११.२३ चे ०८.०० वा<br>दि.०७.११.२०२३ चे १७.५३ वा | प्रथमेश उत्तमसिंग तोमर वय १८ वर्ष रा शाम पाटील राधाकृष्ण मंदीरजवळ पलाश लाईन अमरावती | अज्ञात इसम | हकीकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील फिर्यादी व त्याचा मित्र नामे प्रथम रुम मध्ये झोपुन असतांना रुमचे दार हे टेकलेले होतो त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने उघड्या दाराचा फायदा घेवुन रुममध्ये प्रवेश करुन फि चा लॅपटॉप एच पी कंपनीचा किं अं १५०००रु चा व एक जुना विवो वाय ७२ कंपनीचा मोबाईल किं अं ७००० रु. व मित्र प्रथम यांचा एक जुना वापरता रियल मी कंपनी चा मोबाईल किं अंदाजे ४००० रु चा असा एकुण २६०००रु चा मुददेमाल चोरीस नेला.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो.स्टे राजापेठ अमरावती अप.क्र. ९५८/२०२३ कलम ३८० भा.द.वि. | MIDC D-१५/१ MIDC अमरावती शहर | ०५/११/२०२३ चे ०७.०० वा पुर्वी<br><br>दा.ता.वे ०७/११/२०२३ चे १६.२४ वा. | अजयकुमार कन्हैयालाल छतवाणी | अज्ञात | गुन्ह्यातील थोडक्यात हकीकत अश्या प्रकारे आहे की,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे नेहमी प्रमाणे त्याच्या कंपनीच्या बाजुने हनुमान मंदीराला पुजा करून कंपनी मध्ये गेले असता फि ला कंपनीच्या मागच्या भितींचे ग्रील तुडलेले दिसले फि ने मशिनचे पार्ट चेक केले असता १) लोखंडी बेटींग गुटखे कि अ ७०००/-रू२)हेल्ही डाय लोखंडी कि अ १२५००/-रू ३)अल्युमिनीयम रिंग दोन नगर कि अ ७५००/-रू ४)सायकल कि अ १५००/-रू ५) टुल बॉक्स कि अ २५००/-रू असा मशीनचा मालि कि अ ३१०००/-रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला वरून फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो.स्टे राजापेठ अमरावती अप.क्र ९५७/२०२३ कलम भा.द.वी ३७९ | एस एस टी टेरीस्ट अपार्टमेन्ट पार्कींग मधुन शंकर नगर रोड सुरज नगर अमरावती शहर | ०५/११/२०२३ चे २३.४५ वा. दरम्याने<br><br>दा.ता.वे ०७/११/२०२३ चे १६.०६ वा. | कुनाल अशोककुमार भाराणी वय ३० वर्ष रा शंकर नगर रोड सुरज नगर अमरावती | निरंक | हकीकत अश्या प्रकारे आहे की ,नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी दिनांक ०५.११.२०२३ रोजी मी बाहेरून घरि परत येऊन रात्री ११.४५ वा दरम्यान माझी पाढऱ्या रंगाची होन्डा अँक्टीवा गाडी क्रमांक MH २७AY७३०१ कि अ २०,०००/-रू मोपेड गाडी एस एस डी टेरीस्ट अपार्यमेन्ट पार्कींग मध्ये लावली व दुसऱ्या दिवशी दिनांक ०६.११.२०२३ रोजी सकाळी ०८.००वा दरम्यान माझी गाडी बाहेर जाण्यासाठी पाहली असता ठेवलेल्या जागी दिसुन आली नाही माझा गाडीचा आज पावेतो शोध घेतला असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली अशा अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

## पळवुण नेणे -

| :अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोतवाली अप क्र ५०९/२० २३ कलम ३६३ भादवि | अमरावती | ०७.११. २०२३ चे ०८.३० ते ०८.४५ वा दरम्यान दाखल ता वेळ दिनांक ०७.११. २०२३ चे २०.०१ वा | एक महिला | शाम उर्फ अमन कनोजीया वय २० रा दवारकानाथ नगर अमरावती | नक्कलजबानि रिपोर्ट दि ०७.११.२३ रोजी माझी मुलगी ही सकाळी ०८.३० ते ०८.४५वा दरम्यान १२ वी चा फॉर्म भरणे करीता महाविदयालय येथे घुरुन गेली परंतु ती दुपारी ०१.०० वा पर्यत घरी परत आली नाही म्हणुन आम्ही तिला पाहणे करीता महाविदयालय शाम चौक अमरावती येथे गेलो अमन कनोजीया हा माझे मुलगी सोबत नेहमी बोलत असल्याने त्यानेचे महाविदयालय येथुन फुस लावुन पळुन नेले आहे म्हणुन मी शाम उर्फ अमन कनोजीया याचे विरुध्द माझी मुलगी हिला फुस लावुन पळुन नेल्या बाबत कायदेशीर कार्यवाही करीता रिपोर्ट देते आहे अश्या फि च्या जबानि रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विनंयभग -

| :अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ्रेजरपुरा अप. न. ९४८/२०२३ क. ४४८,३५४,२९४,५०६ भादवि. | अमरावती | घटना ता वेळ - दि. ७/११/२०२३ चे १४/०० वा.<br><br>दाखल ता वेळ - दि. ०७/११/२०२३ चे १७/५२ वा. | एक महिला अमरावती | पंकज बळवंत थोरात वय ५५ वर्ष अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील आरोपी हा फिर्यादीच्या घरा शेजारी राहतो. तो त्याच्या घरात एकटाच राहतो व आरोपी हा फिर्यादीच्या घरासमोरुन जेव्हा जेव्हा जातो घाणेरड्या शिवीगाळ करतो. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या घराचे काम करण्यासाठी मिस्त्री आले असता यातील आरोपी याने मिस्त्री समोर फिर्यादीला म्हटले की तुम्हाले घराचे कोणतेही काम करु देणार नाही आरोपी हा फिच्या घरात आला आणी म्हणाला की तुम्हाले सर्वाणा पाहुन घेतो. म्हणुन फिला लाज वाटले अश्या पद्धतीने ओढताण केली व अश्लील शिवीगाळ केली अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

विश्वासघात (फसवणुक )           :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १३४६/२३ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, भादवि सहकलम ६६(क)(ड) मातंका | उपजिल्हाधी कारी कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय जवळ अमरावती | दि.०३.११.२३ ते ०७.११.२०२३<br><br>दि.०७.११.२०२३ चे १९.५४ वा | श्री राम अरुण लंके वय ५१ वर्ष रा अर्जुननगर अमरावती (उप जिल्हाधीकारी) | मो क्र  धारक | हकीकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील  फिर्यादी हे उपजिल्हाधीकारी (रोहयो)या पदावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना संबंधीत अमरावती येथए काम करित असतांना अंकेक्षण विभागात १०० जागेकरिता उमेदवाराची निवड करण्याकरिता पात्र शासकिय वेबसाईट वर ऑनलाईन प्रसिदध करण्यात ३०० उमेदवार पैकी ४.महिला चे नियुक्ती आदेश देण्याकरिता अज्ञात व्यक्तीने त्याच्या  मो क्र वरुन फोनद्वारे संपर्क करुन पैशाची मागणी केली तसेच उमेदवार क्र २७५ पंकज घिकार यास फिर्यादी व श्री गिरीष धायगुडे यांच्या खोट्या सह्याचे बनावट व बोगस नियुक्तीपत्र त्याच्या मोबाईल वर व्हॉटसअँप द्वारे पाठवुन त्याची नियुक्ती झाल्याचा बनाव करुन त्याच्याकडुन पैसे ऑनलाईन स्वरुपात घेवुन उमेदवारांची व शासनाची फसवणुक केली.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद |

## अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगवापेठ अप क्र ४३७/२३ कलम २७९, ४२७ भादवी | टोलनाका नांदगावपेठ | दि ०७/११/२३ चे ११/०५ते १३/३० वा दरम्यान दाखल ता वेळ दि ०७/११/२३ चे १७/५१ वा | लक्ष्मण पुंडलीक रेवगडे वय ४४ वर्षे रा.रहाटगाव | दहा चक्का ट्रक क्र. MH ४८ J ०३५१ चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की याकील फिर्यादी हे टोलनाका नांदगावपेठ येथे डेप्युटी मॅंनेजर या पदावर नोकरी करीत असुन नमुद घटणा ता वेळी व ठिकाणी नागपुर कडुन अमरावती कडे जाणारा नमुद दहा चक्का ट्रक क्र MH४८J०३५१ चा चालक याने आपले वाहण निष्काळजीपणाने चालवुन टोलनाका येथील W०२क्रमांकाचे बॅंरीकेट गेट तोडुन नुकसान करुन निघून गेला.तसेच वापसीमध्ये परत येवुन वाहचालकाने लेन क्र E०२ बॅंरीकेट गेट तोडुन नागपुरकडे न थांबता निघून गेला.अशा फि यांचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोठाणे बडनेरा अप क्र ७८६/२०२३ कलम १३५ भाविका | गणोजा देवी ता भातकुली जि अमरावती | घटना दि ०५/११/२०२३ चे १२.१३ दाखल दि ०७/११/२०२३ चे १८/०२ | योगेश लहाने वय ४१ वर्षे सहाय्यक अभियंता भातकुली वितरण केद्र रा साई नगर अमरावती | रामकृष्ण महादेव गुल्हाने वय ५० वर्षे रा गणोजा देवी ता भातकुली जि अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून महावितरण चे २३३९ वीज युनीट कि . अं. ३४२५० रू. ची चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोठाणे बडनेरा अप क्र ७८७/२०२३ कलम १३५ भाविका | गणोजा देवी ता भातकुली जि अमरावती | दि ०५/११/२०२३चे १२.२० दि ०७/११/२०२३ चे १८/२० | योगेश लहाने वय ४१ वर्षे सहाय्यक अभियंता भातकुली वितरण केद्र रा साई नगर अमरावती | मोहन दशरथ जोगे वय ३५वर्षे रा गणोजा देवी ता भातकुली जि अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांच्या स्टाफसह वीज चोरी पकडणे मोहीम राबवित असतांना आरोपीने त्याच्या मिटरमध्ये अनधिकृतपणे छेडछाड करून महावितरण चे १८०० वीज युनीट कि . अं. २७१६० रू. ची चोरी केल्याचे आढळुन आले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. विलबांचे कारण -फिकडुन<br>दाखल अधिकारी-परि.पोउपनि. तुषार गावंडे, पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. मो. नं. ९८२२१९६४६४ |
| ३ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १३४७/२३ कलम ६६ (ड) मातंका | रामलक्ष्मण संकुल रामपुरी कँम्प अमरावती | दि.१८.०४.२३ चे १६.०० वा<br><br>दि.०७.११.२०२३ चे २१.०३ वा | भारत महेशकुमार उर्फ टहलराम आसुदानी वय ४० वर्ष रा रामपुरी कँम्प अमरावती | अज्ञात इसम. | हकीकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील फिर्यादी यांना एक अनोळखी मो क्र यावरुन अनोळखी व्यक्तीचा फोन आला व म्हटले की,तुमचे इलेक्ट्रीक बिल पेडींग आहे तुम्ही ते बिल ऑनलाईन पेड करा मी महावितरण मधुन बोलत आहे त्या व्यक्तीने फि यांना प्लेग स्टोन मधुन एक महावितरण चे अँप डाऊनलोड करण्यास सांगितले फि ने डाऊनलोड करुन इलेक्टीक बिल टी रक्कम ९७५ रु एस बी आय अकाऊंट वरुन पे केले तर नमुद अनओळखी इसमाने फि यास म्हटले की एस बी आय मधुन बिल पे होणार नाही दुसऱ्या बँकचे खात्यातुन करा तर फि ने आय डी बी आय खाते वरुन बिल पे केले वरुन फि चे खात्यातुन एकुण १४७५०० रु चे डेबीट मँसेज आले अशा प्रकारे फि ची फसवणुक केली..अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद |

**अकस्मात मृत्यु :-**

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा मर्ग क्र. ६८/२०२३ क. १७४ जाफौ | संजय गांधी नगर न. २, गल्ली न. १, अमरावती दि. ०७/११/२०२३ चे १०/०० वा. दाखल ता वेळ - दि. ०७/११/२०२३ चे १६/३१ वा. | पांडुरंग फेसाजी समधुरे वय ५० वर्ष रा. श्रद्धा किराणा जवळ, संजय गांधी नगर न. २, गल्ली न. १, अमरावती | राहुल तुळशिरामंजी राउत वय ४५ वर्ष रा. श्रद्धा किराणा जवळ, संजय गांधी नगर न. २, गल्ली न. १, अमरावती | चक्कर येवुन खाली पडल्याने मृत्यु | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी सोनु बार मध्ये कामाला गेले असता फिची पत्नी हीने फिर्यादीाला फोन करुन माहीती दिली की माझे सासरे हे घरातील आंगणामध्ये चक्कर येवुन पडल्याने त्याना माझी पत्नी व साळा तेजस यांच्या सोबत आँटो मध्ये इर्विण दवाखाणा येथे घेवुन गेलो अशता डाँ. यांनी तपासणी करुन मरण पावले बाबत सांगीतले माझे सासरे टेशन घेत असल्याने चक्कर येवुन खाली पडल्याने मरण पावले आहे. त्याच्या मरणा बाबत आम्हास कोणताही संशय नाही अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |

## जुगार :—

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा | अपक्र. ७८५/२०२३ कलम १२(अ) मजुका सहकलम १०९ भा.दं.वि. | बालाजी नगर ठाकुर अँक्वा जवळ खुल्या जागेमध्ये नवी वस्ती बडनेरा | दि.०६.११.२०२३ चे २२.३० वा. | दि.०७.११.२०२३ चे ०१.२७ वा. | सरतर्फे नापोका शशिकांत शेळके ब.न.१३६० पो,स्टे बडनेरा अम | १)आकाश संतोष जरे वय- २६ वर्ष रा. हमालपुरा नवी वस्ती बडनेरा<br>२) अकरमअली इद्रिसअली वय- ३७ वर्ष रा. खैरमोहम्मद प्लॉट जुना अकोला जि.अकोला<br>३) जमीर खान युसुफ खान वय- ३४ वर्ष रा. भारतीपुरा कारंजा जि.वाशिम<br>४)दिलीप संतोषराव मानकर वय- ३२ वर्ष रा. भिमनगर चांदुर रेल्वे<br>५) श्रीकुष्ण तुळशीराम तायडे वय- ४८ वर्ष रा. हरिदास पेठ नवी वस्ती बडनेरा<br>६) अभिषेक नरेंद्र सरडे वय- २१ वर्ष रा. माळीपुरा नवी वस्ती बडनेरा<br>७) पंकज झंझाड वय३८ वर्ष रा. झंझाडपुरा नवी वस्ती बडनेरा<br>८) गजानन कदम वय- ३६ वर्ष रा. हमालपुरा नवी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी ८५००/- रु. व बावन ताश पत्ता की,अं.२०/- रु. असा एकुण ८५२०/- रु. चा माल मिळुन आला. तसेच जुगार खेळणारे इसमांना विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, सदर जुगार हा गजानन कदम हा चालवितो व त्यांचे सांगण्यावरुन आम्ही खेळत असतो. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | नागपुरी गेट अम. | अप क्र. ५६९/२३ कलम १२ (अ) मजुका | सुकळी जि. अम. | दि. ०७/११/२०२३ चे १५/०० वा. ते १५/३० वा. | दि. ०७/११/२३ चे १६/२६ वा. | पोहेका किशोर प्रभाकर महाजन बन. १२२९ पो.स्टे. ना. गेट अम. | सुधीर देवराव मेश्राम वय २६ रा. सुकळी ता. अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांना माहीती मिळाली की, एक इसम हा ग्राम सुकळी येथे हनुमान मंदीराचे बाजुला निंबाचे झाडाखाली वरली मटका नावाचा पैशाची हारजित करुन जुगार खेळ खेळत आहे. घटनास्थळी पंचासमक्ष जावुन आरोपी ला ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातुन १)नगदी १८०/- रु. २) एक बॉल पेन कि. अं. ५/- रु. ३) वरली मटका चिठ्या कि. अं. ००/- रु. असा एकुण १८५/- रु. चा माल मिळुन आला. नमुद आरोपी चे कृत्य कलम १२ (अ) मजुका प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुद्ध सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो.स्टे. खोलापुर गेट | 234/2023 कलम 12 (अ) जुगार | गांधी आश्रम अमरावती | घ.ता.वेळ 07/11/2023 चे 15/00 वा | दाखल दि. 07/11/2023 चे 16/43 वा. | सरतर्फे नापोकॉ.मंगेश ब.न.202 वय 40 वर्ष पो.स्टे. खोलापुरी गेट | अशोक विठ्ठलराव खंडारे वय 49 वर्ष रा.गांधी आश्रम अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे यातील फिर्यादी सरतर्फ नापोकॉ.मंगेश ब.न202 व पो.स्टॉफ पोहवा 1114,पोकॉ.1611,1620 असे गुन्हेगार चेक व अवैध धंद्यावर रेड करणे कामी पो.स्टे.हद्दीत खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करित असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाली की एक ईसम हा गांधी आश्रम अम येथे त्याचे राहते घरासमोर मिळाल्या वरुन नमुद आरोपीवर जुगार रेड केला असता एक ते दहा आकडे चे वरली मटका चिठ्टा लावणारे लोक पळुन गेले व चिठ्टी लिहणारा ईसम जागीच मिळुन आला त्याची अंहझडती घेतली असता त्याचे वरली मटका आकडे लिहलेल्या चिट्टी एक बॉलपेन कि.अं.05 रु जुगाराचे नगदी 186/-रु असा एकुन 191/-रु चा मुद्देमाल जप्त केला आरोपीचे चे कृत्य कलम 12 अ जुगार प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हीशनः—

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा | अप. न. ९४९/२०२३ क. ६५(ई) मदाका | कुंभारवाडा, फ्रेजरपुरा अमरावती | दि. ०७/११/२०२३ चे १४/५५ वा ते १५/४५ वा. | दाखल ता वेळ - दि. ०७/११/२०२३ चे १९/०६ वा. | पोहेकाँ गजानन ढेवले ब. न. १६९ गुन्हे शाखा अमरावती शहर | भुरु गंगा बेनीवाले वय ५५ वर्ष रा. कुंभारवाडा बायपारोड फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टाँफ सह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की यातील आरोपी हा त्याच्या राहत्या घरासमोर लोकांना अवैधरित्या देशी दारुची विक्री करीत आहे अश्या माहीती वरुन यातील आरोपी याच्या वर प्रोव्ही रेड केली असता त्याच्या ताब्यातुन ३० नग देशी दारु बाँबी संत्रा ९० एम एल सिलबंद पावट्या कि. अ. १०५०/- रुपयेचा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला अश्या फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | फ्रेजरपुरा | अप. न. ९५०/२०२३ क. ६५(ई) मदाका | अमरावती | दि. ०७/११/२०२३ चे १५/०५ वा ते १५/५५ वा. | दाखल ता वेळ - दि. ०७/११/२०२३ चे १९/४३ वा. | पोहेकाँ. दिपक सुंदरकर ब. न. १४५६, गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महिला | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टाँफ सह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की यातील महीला आरोपी ही तीच्या राहत्या घरासमोर लोकांना अवैधरित्या देशी दारुची विक्री करीत आहे अश्या माहीती वरुन यातील महीला आरोपी हीच्या वर प्रोव्ही रेड केली असता त्याच्या ताब्यातुन ३० नग देशी दारु बाँबी संत्रा ९० एम एल सिलबंद पावट्या कि. अ. १०५०/- रुपयेचा प्रोव्ही माल जप्त करण्यात आला अश्या फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |